थोडी गंमत – 5

1) गाळलेल्या जागा भरुन खालील वाक्ये पूर्ण करा.

1-1) दूधात --- घालून देऊ ना?
1-2) सभ्य स्त्री --- हो! आज मला इथे भाषण करायला बोलावल्या बद्दल ---
1-3) तुम्ही मला तुमचा --- दिलात तर मी पाक़िट पोस्टात टाकून येतो.
1-4) तुम्ही भात कशा बरोबर खाणार? --- बरोबर का ------ बरोबर?
1-5) मला खूप -- लागली आहे. आई, मला काय --- देतेस?
1-6) देवळात जायच्या आधी --- बाहेर काढून ठेवा.
1-7) पावसातून आलास ना? --- धुवूनच आत ये.
1-8) खुर्चीचा पाय मोडला आहे. तू इथे -- बस.
1-9) आज आपल्याला लग्नाला जायचे आहे. आपण तिथे काय – द्यायची?
1- 10) संध्याकाळ झाली. देवापाशी --- लावायला हवा.

2) खोबर्यायपासून आपण काय, काय पदार्थ तयार करतो? तुम्हाला त्यातील कुठले आवडतात?

3) दोन दिवस पावसाचे
दोन दिवस न थांबता पाऊस पडतो आहे. पावसाची मजा लुटण्यासाठी सगळ्या शहराला सुट्टी दिली आहे. परंतु कुठेही पाणी साचलेले नाहीये, वीज गेलेली नाहीये. तुमची मुले, नातवंडे घरी जमली आहेत. जरा कल्पना करा. अशा परिस्थितीत तुम्ही काय, काय मजा कराल?

4) भारताबद्दल काही प्रश्न -

4-1) भारताला स्वातंत्र्य किती साली मिळाले?

4-2) भारताचा प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन केव्हा साजरा केला जातो?

4-3) भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हां तुम्ही किती वर्षांचे होतात?

4-4) ब्रिटीशांच्या काळातील तुम्हाला काय काय आठवणी आहेत?

4-5) कुठल्या स्वातंत्र्यसेनानींच्या कथा तुम्हाला आठवतात?

4-6) त्यावेळचा भारत आणि आत्ताचा भारत ह्यामध्ये काय बदल झाले आहेत?

5) सुडोकू

1	2		
		2	1
2	4		
		4	2

6) खालील चित्रात तुम्हाला किती चेहेरे दिसतात?

7) प्रत्येक ओळीतील अयोग्य आकड्याभोवती वर्तुळ काढा

2, 6, 10, 8, 17, 12, 16

30, 25, 40, 20, 50, 70, 60

3, 9, 15, 18, 14, 21, 6

4, 8, 11, 16, 20, 24, 32

2, 4, 19, 8, 16, 32, 64

8) खालील आकड्यामध्ये काय विशेष आहे?
4,095,716,283

वरील आकड्यात 0 ते 9 हे सगळे आकडे आहेत.

9) नाण्यांचा मनोरा

वेगवेगळी नाणी घ्या. दोन खेळणार्यांेमध्ये ती वाटून घ्या. त्या नाण्यांचा मनोरा तयार करा. मनोरा तयार करतांना एका वेळी चारच नाणी घ्या आणि त्यांचा मनोरा तयार करायला घ्या. दोघे खेळाडू वेगवेगळे मनोरे तयार करु शकतात किंवा एकाच मनोर्यांावर नाणी लावू शकतात. खेळामध्ये गंमत आणण्यासाठी नाणी कुठली घ्यायची, कशी निवडायची, किती वेळात लावायची ह्याबद्दल तुमचे तुम्ही नियम तयार करु शकता. नियम खेळाडूंना जाचक वाटणार नाहीत, मजेच्या आड येणार नाहीत ह्याची मात्र काळजी घ्यायला हवी.